# ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

एक शहर आहे जगात, म्हणतात ते फ़ार वेगळे आहे..
जे मला अनुभवले तेथे राहुन, ते तुम्हाला सांगतो आहे.
पण प्रत्येकाची सांगायची एक पध्द्त असते
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

सकाळी उठणे, हे सुद्धा एक काम आहे..
रात्री ची झोप, हा काल्पनिक आराम आहे.
त्या उशीवर मला झोप येत नाही..
माझ्या डोक्याला ट्रेन च्या पत्र्याची सवय आहे.
जिथे उशीची माया, लोखंडी पत्र्यात मिळते
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

दात घासने, आंघोळ करणे, याला पूरेसा वेळ नाही...
नाश्ता करताना, तयारी करणे यासारखा मजेशीर खेळ नाही.
बूट घालायच्या आधी, धावत देवासमोर जायचे
“EMINEM” ला देखील जमणार नाही, असे "साष्टांग नमन" म्हणायचे.
देवासमोर एक मिनीट, हीच देव पूजा असते.....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

बिल्डींग च्या पाय~या उतरेपर्यंत, कहितरी विसरल्याचे भान होते...
आणि हा आज काय विसरला आहे, याचे अख्ख्या बिल्डींग ला ज्ञान होते.
"नीट जा", " सांभाळून ये", हे आईच्या हात-वा~याने सुध्दा कळते....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

बिल्डींग चा गेट सोडला, की रांगांची रांग लागते,
रिक्षा, बस, ट्रेन चे टिकीट, काहीही कारण चालते.
रस्त्यावरून चालणारा प्रत्येक जण धावत असतो,
मिनीटाला १०० पाऊले असा इथे हिशेब असतो.
रस्ता आपल्या बापाचा समजून चालायचे असते....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

शिव्या देत, शिव्या खात, प्लॅटफ़ोर्म वर पोचायचे असते
मुंग्या मधली साखर शोधावी, असे मित्रांना शोधायचे असते
ट्रेन मधले मित्र, खरे मैत्रीला जागणारे असतात...
एकामुळे तिघांना जागा मिळावी, असे जागा अडवून बसतात.
रिझर्वेशन नसूनही,प्रत्येकाची जागा FIXED असते.....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

काहींच्या दोन डब्यांपैकी, एक डब्बा ट्रेन मधेच उघडतो,
"तेरी भाभी हाउसवाईफ़ है रे" असे म्हणून तो पण शेफ़ारतो.
"भाभी" वर दया येण्याचे काही कारण नाही....
"कालची भाजी" संपवायचा तिचा हा सोप्पा मार्ग असतो.
पोट भरण्यासाठी नव्हे, तर वाटून खाण्यासाठी खायचे असते,
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

ट्रेन मधून उतरणे, हा सूध्दा एक प्रवास असतो...
आणि कोणावर नसून, पूढे उभ्या असणा~यावर अवलंबून असतो.
पाठ्च्याला उतरायचे आहे, म्हणून तोही बेफ़िकीर असतो...
अश्या या घट्ट विश्वासामूळेच, प्रत्येक जण आपले ठिकाण गाठतो.
बाहेर पडल्यावर पहिले काम, शर्टाच्या सुरकुत्या मोजणे असते....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

एवढे युध्द ज्यासाठी केले ते ठिकाण समोर असते,
कोणासाठी अभ्यास, कोणासाठी पगार, तर कूणासाठी "नूसता त्रास" असते.
आगमन होता क्षणीच निघण्याची वेळ ठरवायची असते....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

घरी परतण्याचा विचारच फ़ार आनंददायी असतो,
प्रत्येकाचा परतण्याचा मार्ग मात्र वेगळा असतो.
प्रेयसी बरोबर समुद्रकाठ किंवा गार्डन मधली किलबिल...
मित्रांबरोबर "बार" नाहीतर " KINGFISHER" चा  छोटा रिफ़ील.
नाहीतर थेट घरी जाऊन क्रिकेट मैच बघायची असते.
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

आईच्या हातचा चहा हेच घरी पोचण्याचे समाधान...
तिची सिरीयल–माझी मैच यासाठी रिमोट ची ताणाताण.
ब्रेक वगळून एकाच वेळी ३ सिरीयल पाहिल्या जातात...
आणि जेवणाचे दाणे सर्वात आधी त्या रिमोट च्या घशात जातात.
जेवणाची वेळ ही फ़क्त टीवी वर अवलंबून असते.....
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

पण सिरीयल बघायचे बंधन मात्र कुणाला नसते...
कूणाकडे कट्टा, कूणाकडे ईंटरनेट , असे साधन असते.
कूठे KEYBOARD ची किटपिट, कूठे कट्ट्यावरचा हशा असतो...
पण, "जेवणाची हाक" हा " EMERGENCY ALARM" असतो.
लोणच्या, पापड सकट, अख्या दिवसाची कहानी तोंडी असते...
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

जेवणा नंतर झोप अगदी वाईट सवय आहे...
म्हणूनच COLONY मधून फ़ेरफ़टका आता आमची गरज आहे.
या एका तासात COLONY तल्या नव्या–जून्या ची खबर होते...
आणि आपण ही त्याचा एक भाग आहोत याची गोड जाणीव होते.
झोपण्यासाठी नव्हे तर सकाळी उठण्यासाठी घरी परतायचे असते..
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

मोबाईल, ईंटरनेट यांच्या बरोबरच बिछाना असतो..
पून्हा एकदा देवापूढे "EMINEM" आणि डोळ्यांना आराम असतो.
सकाळचा अलार्म थोडा उशीरा वाजावा, हेच एकमेव स्वप्न असते...
पण मुंबईतला एकमेव प्रामाणिक, अशी घडाळ्याची ख्याती असते.
देव देवघरी असला तरी त्याचे सर्व काम इथे घड्याळ करते......
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

असा हा नित्यक्रम सोम ते शुक्र असतो,
पण बाकीचे दोन दिवस आमचा दिनक्रम बदलतो.
जे पाच दिवसात भेटले नाहीत,असे मित्र भेटतात...
थेटर, पब, बीच, टेरेस, सर्व ठिकाणे जागवतात.
"आईला एक दिवस आराम" हे रात्री बाहेर जेवणाचे कारण असते
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

असा हा आठवडा, त्याचेच महिने घडावे.....
दिवसातील २४ तास ही, इथे कमी पडावे.
अशी ही श्रमाची बैंक, जिथे तक्रार काउंटर नाही...
मैत्रीचे व्याज मिळत रहाते, आणि जास्त तोटा ही नाही.
शोधणाऱ्यासाठी सगळे आहे, फ़क्त वेळ मात्र सापडत नसते...
ही मुंबई आहे मुंबई, इथे असेच असते.......

प्रशांत पेंडूरकर
एक मुंबईकर.....